**RNI No. MAHBIL /2009/35527**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष ११, अंक ४१(४)] शुक्रवार, नोव्हेंबर २८, २०२५/अग्रहायण ७, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**HOME DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032.
dated the 28th November, 2025.

*NOTIFICATION*

BHARATIYA NAGARIK SURAKSHA SANHITA THE STATE OF MAHARASHTRA ELECTRONIC PROCESSES (ISSUANCE, SERVICE AND EXECUTION OF E- SUMMONS/E-WARRANT) RULES, 2025

No. BNSS/0325/C.R.34/ Special-09.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 64 and of clause (i) of section 530 and other enabling provisions of the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 (46 of 2023), in its application to the State of Maharashtra, the Government of Maharashtra, hereby, makes the following rules, namely.—

**1.** Short title and commencement.—

(1) These rules may be called the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita the State of Maharashtra Electronic Processes (Issuance, Service and Execution of e-summons/e-warrant) Rules, 2025.

(2) They shall come into force from the date of their publication in the official Gazette.

2. Definitions.—

(1) In these rules, unless the context otherwise requires-

(*a*) "CCTNS" means Crime and Criminal Tracking Network and Systems, a system software used by the Police for the collection of data and execution of instructions ;

(b) "CIS" means Case Information System, a system software used by the District Judiciary and High Courts for the collection of data and execution of instructions;

(c) "Disclosed Electronic Mail Address" means the email account of a person or organization that is used by the person or organisation to send and receive messages over internet, and is shown to be admitted, or provided by such person or organization either personally or on a website or portal;

(d) "Electronic Communication" as defined in Section2(1)(i) of the Sanhita;

(e) "eSign" means authentication of any electronic record by a subscriber or court, by means of the electronic technique specified in the Second Schedule of the Information Technology Act, 2000 (21 of 2000) and includes digital signature. Also, when a process or report generated in electronic form is authenticated by means of electronic signature, it shall be deemed to be authenticated by signature of the person who affixed the electronic signature;

(f) "High Court" means the High Court of Judicature at Bombay;

(g) "Process" includes summons, warrant or any other forms set forth in the Second Schedule of the Sanhita, with such variations as the circumstances of each case may require, issued for the respective purposes as mentioned in the Sanhita;

(h) "Rules and Orders" means the Maharashtra Rules and Orders (Criminal);

(i) "Sanhita" means the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 (Act No. 46 of 2023);

(j)"Seal" means image of the seal of the Court;

(k) "State" means the State of Maharashtra;

(l) "Summons" means any summons issued under the Sanhita;

(m) "Warrant" means a warrant issued under the Sanhita and includes bailable warrant and non-bailable warrant.

(2) Words and expressions used but not defined in these rules shall have the same meaning as assigned to them in the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 (46 of 2023); the Bharatiya Nyaya Sanhita, 2023 (45 of 2023); the Bharatiya Sakshya Adhiniyam, 2023 (47 of 2023) and the Information Technology Act, 2000 (21 of 2000).

3. The Courts shall generate and issue process in electronic mode through CIS in such forms as set forth in the Second Schedule of the Sanhita, with such variations as the circumstances of each case may require. The same shall be served by an officer of the Court issuing it.

4. When the Court does not possess required electronic address/contact details of the person to whom such process is intended to be served or when the process issued as per rule 3 is not served, it may direct the same to be served by a police officer or other public servant.

5. Every process issued in form of electronic communication under the Sanhita must ordinarily be written in the language of the court and shall be in an encrypted form of electronic communication and shall bear the image of the seal of the Court and eSign.

6. Every process issued electronically shall contain eSign in such a manner that the name of the Court and the capacity in which the signatory or subscriber acts should be clearly mentioned. The summons generated in electronic form shall bear image of the seal of the court and eSign of the appropriate officer of the Court or the Reader or any person authorized in writing in this regard as the case may be. Every warrant of arrest in electronic form shall be issued by eSign of the Presiding Officer of the Court and shall also bear the seal of the Court.

7. Where the processes generated in electronic form are received on CCTNS through a secured system, in an encrypted or any other form of electronic communication, it shall be presumed to be issued by the Court. Further, any printout of such process shall have the same effect as issued in original for the purpose of its execution.

8. The Officer-in-charge of the Police Station shall ensure that the verified details relating to address, disclosed electronic mail address, phone number and messaging application used by the accused or witnesses, as the case may be, are recorded during arrest, investigation or inquiry and entered in CCTNS, Such details shall also be entered in the Register maintained at the Police Station in compliance with sub-section (*1*) of section 64 of the Sanhita. If any of such details is not available, the Officer-in-charge of the Police Station shall make an endorsement to that effect in the Register:

Provided that any such details may be amended on the basis of further verification or on the basis of an application by such person.

9. Where a case is filed on the basis of a private complaint, the complainant shall provide the details relating to address, disclosed electronic mail address, phone number and messaging application of the accused and witnesses along with the complaint. If any of such information is not available, the complainant shall make an endorsement to that effect.

10. The details relating to address, disclosed electronic mail address, phone number and messaging application shall be transmitted in electronic form and maintained in CIS and may be used for issuance of process. Such digital information shall form part of the register under Section 64 of the Sanhita.

11. The details relating to disclosed electronic mail address, phone number and messaging application of the victim and witnesses shall not be disclosed to the accused.

12. The Officer-in-charge of the Police Station or any Sub-ordinate Officer deputed by him upon receipt of summons issued in pursuance of rule 4 may forward the summons on the disclosed electronic mail address, phone number or messaging application of the person summoned.

13. (1) Where summons are served by way of electronic mail, service shall be deemed to have been made if the service provider generates acknowledgement of the delivery.

(2) When any summon is sent to a person or organization on disclosed electronic mail address, unless the delivery of the electronic mail is disrupted or bounced back for any reason whatsoever, the delivery shall be deemed to be effected; and unless the contrary is proved, be deemed to have been effected at the time at which the electronic mail would be delivered.

14. (1) Where summons are served by way of any other electronic communication including messaging application, the acknowledgment shall form part of the report of the service and the report shall contain details including mobile number, messaging application and screenshot/photo of the application reflecting delivery of the communication.

(2) Such delivery may be deemed to be due service of summons/process and a copy of such summons/process along with report of service shall be kept in record as a proof of service of summons/process.

*Explanation.*—Acknowledgement under this rule or under rule 14 include an acknowledgement given by,—

(a) any communication by the addressee, automated or otherwise; or

(b) any conduct of the addressee, sufficient to indicate to the originator that the electronic record has been received.

15. In case verified details of the email address, phone number or messaging application relating to the person summoned are not available, the officer-in-charge of the police station or any police officer deputed shall make an entry in that regard and after taking printout in duplicate of the summons issued in electronic mode, shall execute the same in accordance with procedure prescribed under the Sanhita.

16. When summons are not served by an electronic mail or other mode of electronic communication, or delivery is disrupted and undelivered or bounced back for any other reason, the concerned officer shall prepare a report in that regard containing all details including mobile number, messaging application and screenshot/ photo of the application confirmation of delivery and may proceed as per applicable process.

17. In case of warrant or any other process required to be served in person is issued in electronic mode, the officer-in-charge of the police station or any police officer deputed by him shall take a printout of the warrant or process and execute the same in accordance with the Sanhita and rules made therein.

18. Where any process is served or executed other than through electronic mode the Police Officer while making service or executing the process shall take acknowledgement of the Recipient and may capture photograph, which sha form part of the report of the service.

19. Upon due service or non-service of the warrant, the serving officer of the concerned Police Station shall transmit the service along with relevant documents including bail bonds, photographs, acknowledgment, if any, to the concerned Court in electronic form through CCTNS/NSTEP.

20. The Court, upon receiving the report in electronic form under rule 19, may a upon such report as deemed appropriate. Such report or printout of such repo shall be deemed to be original for the purpose of satisfaction as the service/execution of the process.

21. Where any process is issued in cases relating to offences under sections 64,71 of The Bharatiya Nyaya Sanhita (45 of 2023) or offences against woman child or offences under The Protection of Children from Sexual Offences Act, 2012 and Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2015, the concerned officer shall ensure that the identity of the victim is not revealed any manner in course of service or execution.

22. Any rule made in this behalf shall be in addition to, not in derogation of, any other law or rules made by the High Court to specify for the time being in for issuance, service and execution of process by the Court.

23. If any difficulty arises in giving effect to the provisions of this Rule, the Government of Maharashtra may, by order, published in the Official Gazette, make such provisions not inconsistent with the provisions of this Rule as appear to it to be necessary for removing the difficulty.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. JAYANT SARODE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष ११, अंक ४५(२)] सोमवार, डिसेंबर १, २०२५/अग्रहायण १०, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५.

### अधिसूचना

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रॉनिक प्रक्रिया (इ-समन्स/इ-वॉरंट देणे, बजावणी व अंमलबजावणी) नियम, २०२५.**

क्रमांक भा.ना.सु.सं/३२५/प्र.क्र.३४/विशेष-०९.— भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ ( २०२३ चा ४६ ) याच्या कलम ६४ च्या पोट-कलम ( १ ) द्वारे आणि कलम ५३० च्या खंड ( ठ ) द्वारे आणि महाराष्ट्र राज्यास लागू असलेल्या इतर सक्षम तरतुदींच्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, पुढील नियम तयार करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ —**

( १ ) या नियमांस भारतीय नागरिक सुरक्षा संहिता महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रॉनिक प्रक्रिया ( इ-समन्स/इ-वॉरंट देणे, बजावणी व अंमलबजावणी ) नियम, २०२५, असे म्हणावे.

( २ ) ते, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या —**

( १ ) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

( क ) **"गुन्हा व गुन्हेगार यांचा माग घेणारे नेटवर्क व प्रणाली (सीसीटीएनएस)"** याचा अर्थ, क्राईम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अँड सिस्टम्स पोलिसांकडून माहिती संकलित करण्यासाठी आणि निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी वापरले जाणारे सिस्टीम सॉफ्टवेअर, गुन्हा व गुन्हेगार यांचा माग घेणारे नेटवर्क व प्रणाली, असा आहे;

(ख) **"प्रकरण माहिती प्रणाली (सी.आय.एस)"** याचा अर्थ, जे जिल्हा न्यायालयाकडून व उच्च न्यायालयाकडून माहिती संकलित करण्यासाठी व निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी वापरले जाते असे सॉफ्टवेअर, असा आहे;

(ग) **"प्रकट केलेला इलेक्ट्रॉनिक मेल पत्ता"** याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीचे किंवा संघटनेचे इ-मेल खाते, त्या व्यक्तीद्वारे किंवा संघटनेद्वारे इंटरनेटवर संदेश पाठवण्यासाठी व प्राप्त करण्यासाठी वापरले जाते, आणि अशा व्यक्तीद्वारे किंवा संस्थेद्वारे एकतर, वैयक्तिकरीत्या किंवा संकेतस्थळावर अथवा पोर्टलवर ते मान्य केले आहे किंवा दिले आहे, असा आहे;

(घ) **"इलेक्ट्रॉनिक पत्रव्यवहार"** याचा अर्थ, संहितेच्या कलम २(१)(ठ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे केलेला पत्रव्यवहार, असा आहे;

(ङ) **"इ-स्वाक्षरी"** याचा अर्थ, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००० चा २१) च्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या इलेक्ट्रॉनिक तंत्राचा वापर करून, अभिदात्याने किंवा न्यायालयाने कोणत्याही इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचे प्रमाणीकरण करणे, असा आहे आणि त्यात, डिजिटल स्वाक्षरीचा समावेश होतो. तसेच, जेव्हा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात तयार केलेली प्रक्रिया किंवा अहवाल इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरीद्वारे प्रमाणिकृत केला जातो, तेव्हा तो ज्या व्यक्तीने इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी केलेली आहे, त्या व्यक्तीच्या स्वाक्षरीद्वारे प्रमाणिकृत केल्याचे असे मानण्यात येईल, असा आहे;

(च) **"उच्च न्यायालय"** याचा अर्थ, मुंबई येथील उच्च न्यायालय, असा आहे;

(छ) **"प्रक्रिया"** यात समन्स, वॉरंट किंवा यथास्थिती, आवश्यक बदल केले जाऊ शकणारे, संहितेत नमूद केलेल्या संबंधित प्रयोजनांसाठी दिले जाणारे संहितेच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये नमूद केलेले इतर कोणतेही नमुने यांचा समावेश होतो;

(ज) **"नियम व आदेश"** याचा अर्थ, महाराष्ट्र नियम आणि आदेश (फौजदारी), असा आहे;

(झ) **"संहिता"** याचा अर्थ, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा अधिनियम क्रमांक ४६), असा आहे;

(ञ) **"मुद्रा"** याचा अर्थ, न्यायालयाच्या मोहोरेची प्रतिमा, असा आहे;

(ट) **"राज्य"** याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे;

(ठ) **"समन्स"** याचा अर्थ, संहितेअन्वये काढलेले कोणतेही समन्स, असा आहे;

(ड) **"वॉरंट"** याचा अर्थ, संहितेअन्वये काढलेले वॉरंट, असा आहे आणि त्यात, जामीनपात्र वॉरंट व अजामीनपात्र वॉरंट यांचा समावेश होतो.

(२) या नियमांमध्ये वापरलेले, परंतु, व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग, यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६); भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५); भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ (२०२३ चा ४७) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००० चा २१) यांमध्ये जो अर्थ नेमून दिला असेल, तोच अर्थ असेल.

**३.** न्यायालये, संहितेच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या अशा नमुन्यांमध्ये, प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीनुसार आवश्यक असा बदल करून, प्रकरण माहिती प्रणालीद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आदेशिका तयार करून जारी करील. अशी आदेशिका काढणाऱ्या न्यायालयाच्या अधिकाऱ्याद्वारे तिची बजावणी केली जाईल.

**४.** ज्या व्यक्तीवर अशी आदेशिका बजावयाची आहे, तिचा आवश्यक इलेक्ट्रॉनिक पत्ता/संपर्क तपशील न्यायालयाकडे उपलब्ध नसल्यास, किंवा नियम ३ नुसार जारी केलेली आदेशिका बजावली नसल्यास, न्यायालय ती आदेशिका पोलीस अधिकाऱ्याद्वारे किंवा इतर लोकसेवकाद्वारे बजावण्याचे निर्देश देऊ शकते.

**५.** संहितेखाली इलेक्ट्रॉनिक पत्रव्यवहाराच्या स्वरूपात काढलेली प्रत्येक आदेशिका सामान्यतः न्यायालयाच्या भाषेत लिहिलेली असेल आणि ती इलेक्ट्रॉनिक पत्रव्यवहाराच्या स्वरूपात लिपिबध्द केलेली असेल आणि त्यावर न्यायालयाची मोहोर व इ-स्वाक्षरी असेल.

**६.** इलेक्ट्रॉनिक पद्धतीने काढलेल्या प्रत्येक आदेशिकेत अशा रीतीने इ-स्वाक्षरी असेल की, न्यायालयाचे नाव व स्वाक्षरी करणारा किंवा अभिदाता ज्या क्षमतेत कार्य करीत आहे, ते स्पष्टपणे नमूद केले जाईल. इलेक्ट्रॉनिक स्वरूपात तयार केलेल्या समन्सवर न्यायालयाची मोहोर व न्यायालयाच्या यथोचित अधिकाऱ्याची किंवा वाचकाची किंवा, यथास्थिति, या संदर्भात लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही

व्यक्तीची, इ-स्वाक्षरी असेल. इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत्येक अटक वॉरंट न्यायालयाच्या अध्यक्षपदस्थ अधिकाऱ्याच्या इ-स्वाक्षरीने काढले जाईल आणि त्यावर न्यायालयाची मोहोर देखील असेल.

**७.** जेव्हा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात तयार केलेल्या आदेशिका एका सुरक्षित प्रणालीद्वारे, लिपिबध्द किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक संपर्काच्या स्वरूपात, गुन्हा व गुन्हेगार यांचा माग घेणाऱ्या नेटवर्क व प्रणालीवर प्राप्त होतात, तेव्हा त्या न्यायालयाद्वारे काढल्या गेल्या आहेत असे मानले जाईल. तसेच, अशा आदेशिकेची कोणतीही प्रत तिच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनासाठी मूळ प्रत काढली असल्याप्रमाणेच परिणामक होईल.

**८.** पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी हे सुनिश्चित करील की, अटक, अन्वेषण किंवा चौकशीदरम्यान आरोपीद्वारे किंवा यथास्थिति, साक्षीदारांद्वारे वापरलेला संबंधित पत्ता, दिलेला इलेक्ट्रॉनिक मेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक व संदेशवहनाचे उपयोजक यांचे सत्यापित तपशील नोंदवले जातील आणि गुन्हा व गुन्हेगार यांचा माग घेणाऱ्या नेटवर्क व प्रणालीमध्ये नोंदविले जातील. असे तपशील संहितेच्या कलम ६४ च्या पोट-कलम (१) च्या अनुपालनानुसार पोलीस ठाण्यामध्ये ठेवलेल्या नोंदवहीत देखील नोंदविले जातील. जर अशा तपशिलांपैकी कोणताही तपशील उपलब्ध नसेल तर, पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी नोंदवहीत त्यासंबंधीची नोंद करील:

**परंतु,** अशा व्यक्तीच्या पुढील पडताळणीच्या आधारावर किंवा अर्जाच्या आधारावर अशा कोणत्याही तपशिलात सुधारणा करता येईल.

**९.** खाजगी तक्रारीच्या आधारावर प्रकरण दाखल केले असेल तर, तक्रारदार आरोपीचा व साक्षीदारांचा पत्ता, दिलेला इलेक्ट्रॉनिक मेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक व संदेशवहनाचे उपयोजक यांच्याशी संबंधित तपशील तक्रारीसोबत देईल. जर अशी कोणतीही माहिती उपलब्ध नसेल तर, तक्रारदार त्यासंबंधीची नोंद करील.

**१०.** पत्ता, दिलेला इलेक्ट्रॉनिक मेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक व संदेशवहनाचे उपयोजक यांच्याशी संबंधित तपशील इलेक्ट्रॉनिक स्वरूपात हस्तांतरित केला जाईल आणि प्रकरण माहिती प्रणाली मध्ये ठेवला जाईल आणि ती आदेशिका काढण्यासाठी व ती निर्गमित करण्यासाठी वापरली जाऊ शकते. अशी डिजिटल माहिती संहितेच्या कलम ६४ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीचा भाग बनेल.

**११.** पीडित व्यक्ती व साक्षीदार यांचा इलेक्ट्रॉनिक मेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक व संदेशवहन उपयोजक उघड करण्याबाबतचे तपशील, आरोपीस उघड करण्यात येऊ नयेत.

**१२.** पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी किंवा त्याच्याद्वारे नियुक्त केलेला कोणताही दुय्यम अधिकारी, नियम ४ अन्वये जारी करण्यात आलेले समन्स प्राप्त झाल्यावर ते समन्स, बजावलेल्या व्यक्तीच्या इलेक्ट्रॉनिक पत्त्यावर, दूरध्वनी क्रमांकावर व संदेशवहन उपयोजकावर पाठवील.

**१३.** (१) समन्स इलेक्ट्रॉनिक मेलच्या स्वरूपात बजावण्यात आले असेल तर, सेवा पुरवठादाराने वितरणाची पोच तयार केल्यास, ते बजावण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(२) एखाद्या व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या दिलेल्या इलेक्ट्रॉनिक पत्त्यावर, समन्स पाठवले जाते, त्या इ-मेलची पोच कोणत्याही कारणामुळे खंडित झाली नसेल किंवा तो अयशस्वी (बाऊन्स बॅक) झाला नसेल, तर तो पोचला असल्याचे मानले जाईल; आणि एतदविरुद्ध काहीही सिद्ध झाले नसेल तर, ज्या वेळी इलेक्ट्रॉनिक मेल पोचला असता, त्याच वेळी तो पोचला असल्याचे मानण्यात येईल.

**१४.** (१) संदेशवहन उपयोजकासह (मेसेजिंग ॲप्लिकेशन) अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक संप्रेषण माध्यमाद्वारे समन्स बजावण्यात आल्यास, पोच ही सेवेच्या अहवालाचा भाग असेल आणि त्या अहवालात भ्रमणध्वनी क्रमांक, संदेशवहन उपयोजक (मेसेजिंग ॲप्लिकेशन) व संपर्क झाल्याचे दर्शवणारा उपयोजकाचा छायाचित्रासह/ स्क्रीनशॉट याचा तपशील समावेश असेल.

(२) अशी बजावणी समन्स/आदेशिका योग्य बजावणी असल्याचे मानण्यात येईल आणि समन्स/आदेशिका बजावणीचा पुरावा म्हणून, बजावणी अहवालासह समन्स/आदेशिका प्रत अभिलेखात ठेवली जाईल.

**स्पष्टीकरण.—** या नियमांनुसार किंवा नियम १४ अनुसार स्वीकृतीमध्ये खालील बाबींचा समावेश होईल :—

(क) प्राप्तकर्त्याने दिलेला, किंवा अन्यथा कोणताही संवाद; किंवा

(ख) प्राप्तकर्त्याची अशी कोणतीही कृती, जी मूळ पाठवणाऱ्यास, इलेक्ट्रॉनिक नोंद प्राप्त झाल्याचे सूचित करण्यास पुरेशी असेल.

**१५.** समन्स बजावण्यात येणाऱ्या व्यक्तीचा इलेक्ट्रॉनिक पत्ता, दूरध्वनी क्रमांकाचे किंवा संदेशवहन उपयोजकाचे (मेसेजिंग ॲप्लिकेशनचे) सत्यापित तपशील उपलब्ध नसल्यास, अशा परिस्थितीत, पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी किंवा त्यांनी नियुक्त केलेला कोणताही पोलीस अधिकारी त्यासंबंधीची नोंद करील आणि इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जारी केलेल्या समन्सची दुसरी प्रत मुद्रित करून, संहितेअंतर्गत विहित कार्यपद्धतीनुसार त्यांची बजावणी करील.

**१६.** जर समन्स इलेक्ट्रॉनिक मेल किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे बजावले जात नसेल, किंवा इतर कोणत्याही कारणास्तव वितरणात अडथळा आला असेल आणि ते वितरित झाले नसेल किंवा इतर कोणत्याही कारणास्तव ते वितरित न होता, परत आले असेल, तर संबंधित अधिकारी त्यासंबंधी ज्यात भ्रमणध्वनी क्रमांक, संदेश उपयोजक आणि ते वितरित झाल्याची पुष्टी देणाऱ्या उपयोजकाचे छायाचित्र/स्क्रीनशॉटसह या सर्व तपशीलाचा समावेश असलेला एक अहवाल तयार करील आणि लागू असलेल्या प्रक्रियेनुसार कार्यवाही करील.

**१७.** समक्ष देय वॉरंट किंवा बजावणी करणे आवश्यक असलेली इतर कोणतीही प्रक्रिया इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जारी केली असल्यास, पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी किंवा त्याच्याद्वारे नियुक्त केलेला कोणताही पोलीस अधिकारी वॉरंट किंवा प्रक्रियेची मुद्रित प्रत काढून घेईल आणि संहिता आणि त्याखाली केलेल्या नियमांनुसार त्याची अंमलबजावणी करील.

**१८.** जर कोणतीही प्रक्रिया, इलेक्ट्रॉनिक माध्यमांव्यतिरिक्त इतर मार्गाने बजावली किंवा अंमलात आणली जात असेल तर, पोलीस अधिकारी अशी बजावणी करताना किंवा प्रक्रिया अंमलात आणताना ग्रहित्याची स्वीकृती घेईल आणि छायाचित्र काढील, जो बजावणी अहवालाचा भाग असेल.

**१९.** वॉरंटची योग्य बजावणी झाल्यावर किंवा बजावणी न झाल्यावर, संबंधित पोलीस ठाण्याचा अधिकारी त्यात अंतर्भूत असलेली संबंधित कागदपत्रे, जामीनपत्रे, छायाचित्रे, स्वीकृती असल्यास, त्यांसह बजावणी अहवाल (गुन्हे व गुन्हेगार शोध (ट्रेकिंग) व प्रणाली/राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक प्रक्रियांची बजावणी व पाठपुरावा (ट्रेकिंग)) यांद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात संबंधित न्यायालयास पाठवील.

**२०.** न्यायालय, नियम १९ अंतर्गत इलेक्ट्रॉनिक स्वरूपात अहवाल मिळाल्यावर, अशा अहवालावर योग्य असल्याचे मानण्यात येईल. असा अहवाल किंवा अशा अहवालाची मुद्रित प्रत प्रक्रियेची बजावणी/अंमलबजावणी करण्याच्या पूर्ततेसाठी मूळ असल्याचे समजण्यात येईल.

**२१.** जर भारतीय न्याय संहिता (२०२३ चा ४५) ची कलमे ६४, ७१ यांन्वये गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये किंवा लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ आणि बाल न्याय (बालकांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये महिला आणि बालकांवरील गुन्हे किंवा गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये कोणतीही आदेशिका करण्यात येत असेल तर, संबंधित अधिकारी हे बजावणी किंवा अंमलबजावणीच्या दरम्यान पीडितेची ओळख कोणत्याही प्रकारे उघड होणार नाही, याची सुनिश्चित करील.

**२२.** यासंबंधात केलेला कोणताही नियम, न्यायालयाद्वारे प्रक्रिया जारी करणे, बजावणे आणि अंमलबजावणी करण्यासाठी वेळोवेळी निश्चित करण्याकरिता उच्च न्यायालयाने केलेला इतर कोणताही कायद्या किंवा नियम यांना पूरक असेल, त्यांना न्यूनकारी असणारा नाही.

**२३.** या नियमांच्या तरतुदींना प्रभावी करण्यात कोणतीही अडचण निर्माण झाल्यास, महाराष्ट्र शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ज्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक वाटतील अशा नियमांच्या तरतुदींशी विसंगत नाहीत अशा तरतुदी करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. जयंत सरोदे,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.